# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ११

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १५/६/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र. ३५०

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/५/२०२१ ते दि.३१/५/२०२१ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/८३३ दि. ४/६/२०२१ चे पत्र.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. ३५१

मा.साईनाथ बाबर यांचे दि. ३/६/२०२१ चे पत्र.

प्रभाग २७ ड मध्ये साईबाबा नगर येथे बहूउद्देशीय हॉल बांधणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१–२०२२ चे अंदाजपत्रक | | |
| १) बजेट कोड–सीई२२अे७०४/एसजे२०–१२६२, प्रभाग क्र.२७ ड मध्ये व्यायाम साहित्य पुरविणे | १० लाख | -- |
| २) बजेट कोड–सीई१७अे२२७/एसजे१२–३५९, प्रभाग क्र.२७ ड मधील स्मशानभूमी व दफनभूमीमध्ये सुधारणाविषयक कामे करणे | १० लाख | -- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग २७ ड मध्ये साईबाबा नगर येथे बहूउद्देशीय हॉल बांधणे | -- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

विषय क्र. ३५२

मा.सौ.स्मिता कोंढरे यांचे दि. ८/६/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.४० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन 2021-2022 चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र. ४० क मधील दत्तनगर परिसरात व विविध ठिकाणी रस्ता डांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे (बजेट कोड- CE20A102/SA2-1277) | १० लक्ष | |
| २ | प्रभाग क्र. ४० क मधील भारती विद्यापीठ परिसरात व विविध ठिकाणी रस्ता कॉंक्रिटीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे (बजेट कोड- CE20A1262/ SA15-1157) | १० लक्ष | |
| ३ | प्रभाग क्र. ४० क जैन मंदिर कात्रज व प्रभागातील इतर ठिकाणी रस्ते कॉंक्रिटीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे.(बजेट कोड- CE20A1262/SA15-1160) | १० लक्ष | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | प्रभाग क्र. ४० क मधील भारती विद्यापीठ परिसरात व इतर ठिकाणी रस्ते कॉंक्रिटीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे करणे (बजेट कोड- CE20A1262/SA15-1162) | १० लक्ष | |
| | नविन सुचवलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र. ४० क मध्ये विविध ठिकाणी विद्युत पोल उभारणे | | १० लक्ष |
| २ | प्रभाग क्र. ४० क मध्ये जांभुळवाडी रोड परिसरात विद्युत विषयक कामे करणे व विद्युत पोल उभारणे | | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.४० क मध्ये दत्तनगर ते जांभुळवाडी रोड मधील HT व LT ट्रान्सफार्मर शिफ्ट करणे | | २० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

## माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. ३५३

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/४/२०२१ ते दि.१५/४/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१९२ दि.७/६/२०२१ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ३५४

भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या अखरत्यारितील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मंगलमुर्ती डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५१,७८,८५७=५० पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१,२७,५८६=८१ अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,१५,३१०=४१ अधिक रॉयल्टी र.रु. ६,९९,६३३/- असे एकुण र.रुपये ६४,४२,५३०=२२ पर्यंत होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनिःसारण/१९६ दि.७/६/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. ३५५

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२०२२ अंदाजपत्रक, यादी क्र. बजेट कोड नं. CE22A704/SJ20-1352, प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर समाजमंदिराचे उर्वरित कामे करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १. प्रभाग क्र. २ अ नागपूर चाळ व परिसरात रस्ते विकसित करणे | --- | १० लाख |
| २. प्रभाग क्र. २ अ विविध ठिकाणी रस्ते देखभाल व दुरूस्ती करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ३५६

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२०२२ अंदाजपत्रक, यादी क्र. बजेट कोड नं. CE22A704/SJ20-1293, प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथील समाजमंदिराचे उर्वरित कामे करणे | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| ३. प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथे समाजमंदिराची उर्वरित कामे करणे. | --- | १० लाख |
| ४. प्रभाग क्र. २ अ मधील विविध आरोग्य कोठी व समाजमंदिराची देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | --- | ५ लाख |
| ५. प्रभाग क्र. २ अ मध्ये संतोषनगर येथे सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ३५७

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ८/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र. ३५८

पुणे पेठ बाणेर स.नं.३३, येथे एकूण ८ आ.सी.यू.बेड खरेदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे म.न.पा.कडे मे.डॉनियल मेजरमेंट सोल्युशन कंपनी या कंपनीने त्यांच्या सी.एस.आर. फंडातून जमा करण्यात आलेल्या रक्कम मधून आणि मे.आर.एस. एन्टरप्रायजेस, पुणे यांच्याकडून र.रू.४,८४,०००/- + १८% जी.एस.टी.इतकी रक्कम रूपये पर्यंत काम करून घेण्यात येत आहे. सदर खर्चाची माहिती मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./२०७ दि.९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ३५९

पुणे कर्वेनगर स.नं.११/२ येथील जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक हरीश राजेंद्र जगताप कोथरूड, पुणे-२९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.६०,०००/- (र.रू. साठ हजार फक्त) मनपाने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा ६००/- ने अधिक दराने त्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१११७, दि.१८/२/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३११ दि. १३/३/२०२० विचारासाठी.

विषय क्र. ३६०

पुणे पेठ वानवडी शिवरकर उदयानालगतच्या कै.बापूसाहेब केदारी जलतरण तलाव १ वर्ष कालावधीकरिता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या चार निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक मे.ग्रायफोन सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हिसेस पत्ता- स. नं.५७, आझादनगर, वानवडी, पुणे - ४११०४० यांनी देऊ केलेली मासिक र.रू.१,२१,७१७/- (र.रू. एक लाख एकवीस हजार सातशे सतरा फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ३४,६५०/-( अक्षरी रक्कम रू. चौतीस हजार सहाशे पन्नास फक्त) पेक्षा रक्कम रूपये ८७,०६७/- (अक्षरी रक्कम रू. सत्याऐंशी हजार सदुसष्ट फक्त) ने अधिक दराने त्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत

करारनामा करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ क्रीडा/११०५, दि.१७/२/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३१२ दि. १३/३/२०२० विचारासाठी.

विषय क्र. ३६१

अभियांत्रिकी महाविदयालय पुणे यांचेकडून सार्वजनिक कामासाठी घेतलेले एकूण जागा ६९५५.६२७ चौ.मी. विना भरपाई दिलेली आहे. या बदल्यात पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा प्लॉट नं.६६ क्षेत्रफळ २६१२.२९ चौ.मी. तेथील असणा–या सर्व झोपडयांसह संपूर्ण जागा झोपडपट्टी पुर्नवसन योजना करणेकरिता अभियांत्रिकी महाविदयालय पुणे ( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचेकडे हस्तांतरण करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/९६४ दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३१३ दि. १३/३/२०२० विचारासाठी.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.